# दयामृत्यू



दयामृत्यू संकल्पनेचा विचार प्राचीन काळापासून होत आलेला असला तरी तिचा सखोल आणि व्यापक असा विचार २० व्या शतकाच्या प्रारंभी सुरू झालेला दिसून येतो. दयामृत्यू ही जैव नीतिशास्त्रातील संकल्पना आहे. जैव नीतिशास्त्र हो नीतिशास्त्राचीच एक शाखा मानली जाते.

'Euthanatia' या इंग्रजी शब्दाचा मराठी अर्थ दयामृत्यू असा सांगितला जातो. Euthanatia याचा शब्दश: अर्थ चांगला मृत्यू असा सांगता येतो. दयामृत्यूचा विचार प्रामुख्याने दीर्घ काळापासून असाध्य आजाराने ग्रस्त रुग्णांच्या संदर्भात किंवा शारीरिक व मानसिक दृष्ट्या पूर्णपणे असमर्थ रुग्णांच्या संदर्भात केला जातो. सामान्य व्यक्तींच्या जीवनासंदर्भातही दयामृत्यूचा विचार केला जाऊ शकतो; जेव्हा एखाद्या सामान्य व्यक्तीचे दैनंदिन जीवन जगणे दुर्धर होते; तो सन्मानाचे व आनंदी जीवन जगु शकत नाही त्याच्या संदर्भात ही दयामृत्यूचा विचार होऊ शकतो. असाध्य आजाराने ग्रस्त रुग्ण किंवा सामान्य जीवन व्यवस्थित न जगु शकणारी व्यक्ती 'असे जीवन जगण्यापेक्षा मरण आलेले बरे' असा विचार करू लागते तेव्हा दयामृत्यूचा विचार सुरू होतो.

दयामृत्यू आणि आत्महत्या या दोहोंची पार्श्वभूमी सारखीच आहे. दोन्ही प्रक्रियेत व्यक्ती स्वत:चे दु:ख किंवा यातना यापासून स्वत:ची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु आत्महत्या संबंधित व्यक्ती स्वत: करत असते तर दयामृत्यू मध्ये ती इतरांची (विशेषत: डॉक्टरांची) मदत घेत असते. मनुष्य जसा सन्मानाने जगतो तसा त्याचा मृत्यू देखील सन्मानानेच झाला पाहिजे या साठी दयामृत्यूचा पुरस्कार केला जातो.

दयामृत्यू साधारणपणे तीन प्रकारचा असतो.

(1) ऐच्छिक दयामृत्यू (2) अनैच्छिक दयामृत्यू (3) न-ऐच्छिक दयामृत्यू

या पैकी कोणताही प्रकार स्वीकारावा लागला तर तो दोन पद्धतीने अंमलात आणला जातो.

(4) सक्रिय दयामृत्यू - या पद्धतीत इतर व्यक्तींचा सक्रिय सहभाग असतो

(5) निष्क्रिय दयामृत्यू - या पद्धतीत इतरांची निष्क्रियता असते. रुग्णाला स्वाभाविकपणे मरु दिले जाते.

दयामृत्यू प्राणघातक इंजेक्शन देऊन, श्वासावरोधन करून किंवा मृत्यू यंत्राच्या माध्यमातून दिला जातो.

दयामृत्यू नैतिक की अनैतिक या संदर्भात हे ठरविणे आजपर्यंत शक्य झालेले नाही. कारण जेवढ्या समर्थपणे दयामृत्यूचा पुरस्कार केला जातो, तेवढ्याच समर्थपणे दयामृत्यूला विरोधही होताना दिसून येतो. म्हणून वर्तमानकाळात दयामृत्यू ही एक अनुत्तरीत नैतिक समस्या बनली आहे.

# गर्भपात (स्त्री भ्रूण हत्या)

गर्भपात ही आधुनिक काळातील जशी वैद्यकीय समस्या आहे तशी ती नैतिक समस्या देखील आहे. ती जैव नीतिशास्त्रातील एक महत्वपूर्ण समस्या मानली जाते.

गर्भपात ही अशी प्रक्रिया आहे की ज्या प्रक्रियेद्वारा एखाद्या गर्भास परिपक्व होण्यापूर्वीच संपवले जाते. गर्भावस्थेतील जीव जन्मास येण्यापूर्वीच त्याचे जीवन संपाविण्याची प्रक्रिया म्हणजेच गर्भपात होय. गर्भपात हा सामान्यपणे दोन प्रकारचा असतो.

(1) नैसर्गिक किंवा स्वाभाविक गर्भपात - या प्रकारात कोणत्याही प्रकारचे मानवी प्रयत्न नसतात. स्त्री शरीरातील अंतर्गत घडामोडींचा नैसर्गिक परिणाम म्हणून होणारा हा गर्भपात असतो.

(2) कृत्रिम किंवा अस्वाभाविक गर्भपात - या प्रकारात गर्भवती स्त्री सह किंवा तिच्या इच्छेविरुद्ध इतरांच्या मदतीने गर्भपात घडवून आणला जातो. हा गर्भपात हेतुपुरस्सर घडवून आणला जातो.

गर्भपाताची नैतिक समस्या ही कृत्रिम किंवा अस्वाभाविक गर्भपाताच्या अनुषंगानेच निर्माण होते. शारीरिक व्यंग घेऊन जन्माला येणारा गर्भ, स्त्री जातीचा गर्भ, अनैतिक संबंधातून निर्माण झालेला गर्भ किंवा आधुनिक काळात जीवन जगण्याचे बदलते संदर्भ अशा अनेक कारणांनी कृत्रिमरित्या गर्भपात घडवून आणला जातो. अशावेळी गर्भपात नैतिक की अनैतिक असा प्रश्न निर्माण होतो.

गर्भपाताच्या संदर्भात दोन मुख्य नैतिक प्रश्न/समस्या निर्माण होतात. पहिली समस्या अशी की गर्भावस्थेत असणाऱ्या जीवाचा अंत करण्याचा अधिकार आपल्याला आहे का? दुसऱ्या बाजूने विचार केल्यास एखाद्या स्त्रीला गर्भ नको असेल तर तो नाकारण्याचा किंवा त्याचा अंत करण्याचा तिला अधिकार आहे का?

दुसरी समस्या अशी आहे की 'मानवी जीवनाची खरी सुरुवात कधी होते? ज्या क्षणाला गर्भधारणा होते तो क्षण की जेंव्हा जीव प्रत्यक्ष जन्माला येतो तो क्षण? मानवी जीवनाची सुरुवात असते? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही. म्हणून हा प्रश्न आजही विवादास्पदच राहिलेला आहे.

गर्भपाताचे समर्थन जेवढ्या प्रभावीपणे केले जाते, तेवढ्याच प्रभावीपणे त्याला विरोध ही होताना दिसतो. भारतासारख्या देशात विशेषत: स्त्रीभ्रूण हत्येस प्रखर विरोध होताना दिसून येतो. अशावेळी हा नैतिक प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनलेला दिसून येतो. तरीपण काही धार्मिक अपवाद सोडल्यास बहुतांशी देशात काही मार्गदर्शक अटींवर गर्भपातास कायदेशीर मान्यता आहे.